*कथा क्रमांक २*

# नियती

संध्याकाळची वेळ - पावसाची रिपरिप संपून आता चांगलाच कोसळू लागला होता - हातातल्या पिशव्या सांभाळत तिने चावीने घराचं दार उघडलं आणि समोर सोफ्यावर अनिकेतला बघून तिला हायसं वाटल.अनिकेतने लगेच हातातल्या पिशव्या घेत मनालीला जवळ घेतलं

“तुझा फोन लागत नव्हता मनू, मला काळजी वाटत होती ग”

“ स्पेशल ट्रेन मिळाली रे मला म्हणून बरे झाले आणि फोनचे म्हणशील तर त्याचे चार्जिंग लगेच संपते तू नवा  कधी आणून देणार ते सांग नाहीतर बैस काळजी करत ”

“तुझ्या कडे सगळ्या प्रश्नांना उत्तरे आहेत , ए जरा अशीच थांब काय गोड दिसते आहेस ”

“महाराज मी एक तास पावसात भिजत आले आहे ” मनालीने स्वतःला  अलगद सोडऊन घेतले.

मनालीने ओले कपडे बदलले आणि किचन मध्ये आली.अनिकेतने वाफाळलेल्या चहाचा कप हातात ठेवला.अनिकेतने नेहमीप्रमाणे कुकर लावला होता , भाजी टाकली होती,सलाड तयार होते

“ पाच मिनटात पोळ्या करते मग बसूच जेवायला आपण ”

दोन पोळ्या झाल्या असतील तेवढ्यात बेल वाजली.कोण आलय  ह्या वेळी मनाली च्या मनात आले,बेल परत वाजली आणि तिला आठवलं आज रोहित येणार होता. पावसाच्या नादात ती सगळे विसरली.आज अनिकेतला लेट होणार होते म्हणून तिने रोहितला बोलावले होते .सगळाच प्लान फसला होता. अनिकेतने दार उघडले रोहितला पाहून त्याला खूप आनंद झाला

“अरे यार किती दिवसांनी भेटतो आहे ? ” अनिकेत

“बँकेत काय परिस्थिती आहे तुला माहित आहे ना ? पेपर वाचतोस ना ?”

“माहिती आहे रे , बोल एवढ्या पावसाचा कसा  काय आलास रे?”

तेवढ्यात मनाली बाहेर आली आणि म्हणाली

“ आलाच आहेस तर जेऊन जा आता”

“काय केले आहेस त्यावर अवलंबून आहे ”

“तुझ्या मित्राने केले आहे सगळे” मनाली

“मग छानच असणार, अरे आज एका व्हिजिट होती म्हणून आलो पण पावसामुळे लेट झाले म्हणून म्हटले तुझ्या कडे चक्कर टाकून येऊ. तुझी टेक्नोकोन काय म्हणते आहे? ”रोहित म्हणाला.

“एकदम मस्त ! पुढच्या वर्षी बहुतेक जपानला जायला लागेल”

“गुड ,मजा आहे यार तुमची ”

तेवढ्यात अनिकेतचा मोबाईल वाजला म्हणून तो आत गेला. ते पाहून मनाली बाहेर आली.

“अरे मी विसरूनच गेले होते तू येणार आहेस हे,आता तू असे कर तू परस्पर ये माझ्या ऑफीस मध्ये मग आपण जाऊन येऊ ”मनाली म्हणाली

“तेच करू आपण कारण दिवस आता थोडेच आहेत ” रोहित हळूच म्हणाला “ आणि फोनला काय झाले तुझ्या? बदलून टाक तो फोन”

“ चिंट्या फार मस्ती करतो हल्ली ” अनिकेतला येताना पाहून रोहितने विषय बदलला

मनालीने पटापट जेवायला वाढले . अनिकेत हात धुवायला गेला तेव्हा मनाली ने एक कागद रोहितच्या हातात सरकवला. रोहितने तो पटकन खिशात ठेवला.

हसत खेळत जेवणं उरकली. मनालीने फ्रीज उघडून सगळयांना मुख्वासाचे पान दिले. रोहित -- चला निघतो रे अनिकेत !

अनिकेत - अरे एवढया लौकर निघालास ?

रोहित -- हो बाबा ! विररारला जायचे आहे. पोहोचायला खूप वेळ लागेल. आणि त्यात हा पाऊस. आता ट्रेन्स वेळेवर असू देत मंजे मेलावले . चल. बाय-बाय

अनिकेत व मानली -- बाय !

रोहित गेल्यावर मनालीचे मागचे आवारे परायेन्तर अनिकेत थोडा वेळ T.V. लावून बातम्या ऐकत बसला. मनालीचे हात काम करत होते पण डोक्यातमात्र विचारांचा काहूर मजल होत. अतापार्यंतर उसन औसान आणून सगळयांशी नॉर्मल वागत होती पण आता काय ? अनिकेतला सामोरी कशी जाऊ ? त्याने झार नेहेमी प्रमाणे तिला मिठीत घेतला तर मात्र तिला नकायच रडू कोसळेल ह्याची भीती होती. उद्या रोहितला भेटून सगळया गोष्टींचा शहानिशा करून मगच काय ते ठरवू. पावसात भिजल्यामुळे डोके दुखत असल्याचा बहाणा करून मानली लाईट ऑफ करून डोळे मिटून पलंगावर पडली. अनिकेतही झ्होपून गेला.

मानलीला मात्र झराही झ्होप लागली नाही. एखादा चित्रपट पहातास्ल्यासारखे सगळया गोष्टी डोळयासमोरून सरकत होत्या. बाबांच्या नोकरी सतत होणार्या बदल्या मुळे ; मुलांच्या शिक्षणावर त्याचा परिणाम होऊ नये म्हणून

आईला नेहेमीच बाबांपासून दूर राहावे लागले. पण जसे रोहित-राहुल थोडे मोठे होऊन त्यांना समाज आली, जबाबदारी कळू लागली तसे त्यांना त्यांच्या मामामामीकडे ठेऊन लहानग्या पाच वर्षांच्या मनालीला बरोबर घेऊन त्यांची आई असंला बाबांच्याकडे राहैलागेली. कारण त्यांचीही खूप आबाळ व्हीची. मामामामीही खूप प्रेमर आहेत. त्यांनीही हि जबाबदारी स्वखुशीने घेतली.

मानली आईबाबांच्या उबदार पंखांखाली आणि मायेच्या छायेत वाढत होती. गोरा-रंग, ते गोबरे गाल, आणि त्यावरील खळी, नाझुक्षी जीवनी आणि हसल्यावर दिसणारे ते पान्ध्रेशुब्रा दात, काळयाबोर कुरळया केसांच्या लढी, फारच मोहोग दिसैची. अभैसातही हुशार !

शाळेच्या मोठ्या सुत्यान मध्ये कधी मानली आईबाबांबरोबर मामामिकडे आपल्या भावंडाना भेटीला झीची तर कधी रोहित-राहुल ह्यांच्याकाध्ये जिचे. खूप मज-मस्ती करिअचे. दोन्ही भावंदना बहिणीचामात्र मोठा कौतुक होते. फारच आनंदात सुखात बालपण सरले. हळू हळू काळी मोठी हून उमलू लागली. जसजशी मानली मोठी होत गेली तसतशी ती अधिकच सुंदर जिसु लागली. अनेक मुलांच्या नजर तिचा मागोवा घेऊ लागल्या.

मानली बीकॉम च्या शेवटच्या वर्षात असताना ते जम्मू ला होते. तिच्याच कोलेज मधील म्ब-च्या शेवटच्या वर्षात शिकणाऱ्या सुनील गोरे नावाच्या मुलाने तिला मागणी घातली. हा मुलगा काश्मिरी ब्राह्मण होता. आई-वडील व एक बहिण एवढा सुटसुटीत कुटुंब होता. स्वतःचा घर, गाडी, वडिलांचा केशराचा बिसिनेस होता. नाही म्हणायला कुठेच जागा नव्हती. फायनल

परीक्षा आटपल्या-आटपल्या लग्नहि झले. अगदी खुशीत होती मनाली. लहानपणापासून काश्मीरला असलेला सुनिलाही लालसर गोरा, उंच, रुबाबदार, अगदी मनालीला साजेसाच होता. दोन्ही कुटुंब आनंदात होती. मनालीला तर अगदी आकाश ठेंगणे झाल्या सारखे वाटत होते.

घरातील पूजा आटपली आणि हे जोडपे पेहेलगामला हनिमूनसाठी गेले. दोघांची एकत्र येण्याची वेळ जशी जवळ आली तशी मनालीच्या अंगावर लाजेने रोमांच उभे राहिले, छातीचे ठोके वाढले. माहित नाही काय झले ते पण सुनील तिला चिमटे काढू लागला, डोक्यात गालावर, हातापायावर चापट्या मारु लागाला. तिला काय झले ते कळलेच नाही. प्रथम तिने विचार केला तो लाडाने तिच्या अंगाशी चाळे करत असेल, आणि त्याचा हात तिलाच जास्त जोरात लागल्या सारखे तिला वाटत असेल. पण मग थोड्या वेळाने सुनीलने व्यवस्तीत नवऱ्याचा हक्क बजावला. हे असेच रोज व्हायचे. दिवस अगदी हसत-खेळत, मस्ती-मजा करत निघून जजायचा. रात्री मात्र वेगळाच सुनील असायचा.

सुरुवातीला लाजेमुळे मनाली बुजली होती. पण जेव्हा हातामध्ये पट्टी आली आणि पट्टीच्याठिकाणी काठी आली तेव्हा मात्र तिने हि गोष्ट आईच्या व सासूच्या काना वर घातली. झाले. लगेच एक नाही दोन दोन डॉक्टर झाले. डॉक्टरांनी सुनील मध्ये हि वाईट विकृती असल्याचे सांगितले. हा एक प्रकारचा आजार असतो. सुनीलची औषधे सुरु झली. एरवी एवढा चांगला असणारा, चांगला वागणारा सुनील आणि हा कुठला आजार ?

मनालीचे आई-वडील तिला तिथे राहून द्यायला तयार नव्हते. पण मनालीलाच त्याच्या बद्दल  कणव वाटत होती. डॉक्टरांच्या उपचारांनी परत चांगला होईल असे वाटत होते. मनालीने थोडे धीराने घायचे ठरवले.

काळया कुट्ट अंधाराच्या पोटीच प्रकाशाचा जन्म असतो. सुख आणि दु:ख ह्या दोन धाग्यानीच आयुष्य विणलेले असते. तुम्हाला त्यातला एक धागाच नकोसा वाटत असेल तर कस चालेल ? मनालीने खूप सोसले. कधीतरी एखादी गोष्टी अचानक उभी राहते आणि त्यामागे नक्कीच काहीतरी कारण असते. अचानक काश्मीरमधील एका चकमकीत मोठा गोळीबार झला. त्याच वेळी सुनीलही गायब झाला. त्याला काय झले, तो कुठे गेला, कळलेच नाही. पोलिस तपास झला, हॉस्पिटले शोधली, पण त्याचा पत्ताच लागला नाही.

नंतर मात्र वाट पाहून दोन वर्षांनी मनाली, आई-बाबांच्या बरोबर मुंबईला आपल्या भावा कडे रोहित कडे आली. आता रोहित विरारला स्वतःच्या फल्याट मध्ये राहत होता. त्याच्याकडे, त्याचा लहानपणापासूनच असलेला जिवलग मित्र, अनिकेत, वरचेवर येत असे. फारच हरहुन्नरी व सालस मुलगा ! रोहितचा अनिकेत हा खास मित्र असल्यामुळे त्याला मनालीची इथ्थांभूत माहिती होती. खरेतर मनाली सुट्टी मध्ये मुंबईला आल्यावर अनिकेत व मनालीची नेहेमीच भेट वव्हायची.

दोघंही एकत्र डबा ऐसपैस, लगोरी, पत्ते, वगैरे खेळ खेळायचे. जसे मोठे होत गेले तसे अनिकेतच्या मनात तिने घर केले होते. ती त्याला आवडू लागली होती. पण योग्य वेळी हे मित्राच्या कानावर घालण्याआधीच मनालीचे लग्न ठरले होते.

ह्या वेळी मात्र अनिकेतनि ठाम निश्चय करून वेळ न घालवता सरळ रोहितला मनाली आपल्याला लहानपणापासूनच आवडत असल्याचे सांगून तिच्याशी लग्न करण्याची इच्छा प्रगट केली. मोठ्यांच्या आशीर्वादाने मनाली व अनिकेतचा विवाह झला. मनाली संसारात चांगली रमली. दोघानाही खऱ्या सुखाचा उपभोग घेता आला. प्रेमाने संसार चालू होता. अनिकेत, मनालीची प्रथम पासूनच खूप काळजी घ्यायचा ; तिच्या मनाला फुलासारखे जपायचा. त्यांना एक गोंडस मुलगीही झाली. ' ओवी ' ततीच नाव ! मस्त छान हसत-खेळत सगळ चालू होत. आता लग्न होऊन सहा-सात वर्ष झली होती. अचानक मनालीला ऑफिस मध्ये एक फोन आला. फोनवरील पलीकडच्या व्यक्तीचे भाषण ऐकून तिचे पाय लटपट कपू लागले, घश्याला कोरड पडली, व अंगाला घाम फुटला. पलीकडील व्यक्तीने तिला एक फोन नंबर घेउन त्या नंबर वर मनालीला फोन करायला सांगितला. व चारचदिवसांनी त्याला हॉस्पिटलमधून डिस्चार्ज ळिणार असे सांगितले. वेळ फारच कमी होता. काय करावे ते तिला काळे ना. म्हणूनच आज अनिकेतला उशीर होणार आहे म्हटल्यावर तिनी रोहित ला घरी बोलावून घेतले होते. रोहितशी तिला सर्व बोलायचे होते पण आत्तातरी मानली रोहितला फक्त एका पेपरवर लिहिलेला तो फोन नम्बरच देऊ शकली होती.

रोहित घरी गेल्यावर रात्रभर मनालीच्या डोळ्याला डोळा लागला नाही. जे जे पूर्णपणे विसरून टाकायचा प्रयत्न केला तेच पुन्हा एकदा डोळ्यासमोरून जात होते. तिने रोहितला फोन नंबर दिला खरा पण मग तिने विचार केला रोहितच्या संसारात त्याला काय कमी व्याप आहेत का आणि किती वर्षे घाबरून राहायचं आणि कारण काय? आता तिचे लग्न झालंय, अनिकेत ची तिला पूर्ण साथ आहे मग काय कारण घाबरायचे.
हा फोन आला होता कोण्या सुनील नावाच्या माणसाचा. आता हा सुनील तोच होता कि अजून कोणी तोतया हे कळत नव्हते. मनाली ने ठरवले कि आता जे होईल ते होईल पण आता कोणाच्या तरी आधाराशिवाय उभे राहायची वेळ आली आहे. नवरा नको कि भाऊ नको कि मित्र नको. वेळ आली आहे आपल्या आयुष्याला त्याच्या भूतकाळासकट सामोरे जायची.
अजून एक तिला समजत नव्हते कि हि गोष्ट तिने अनिकेत पासून कशाला लपवून ठेवली. अनिकेत ने तिला तिच्या भूतकाळासकट स्वीकारले होते. हि लपवालपवी संसारात काय कामाची असे तिचे तिलाच वाटले पण अनिकेत ला सांगायच्या आधी तिने ठरवले कि त्या नंबर वर फोन करून काय तो सोक्षमोक्ष लावायचा.
सकाळ झाली पण तिचे कशातच लक्ष नव्हते, ऑफीस मधे पोचल्यावर तिने मोबाईल काढला आणि नंबर फिरवला. पलीकडून एक आवाज आला जो बाईचा होता. ती चपापली, तिने उसने अवसान आणून तिचे नाव सांगितले. पलीकडून बाई हसत म्हणली, कशा आहात? तुमच्याबद्दल किती ऐकलय पण आवाज पहिल्यांदाच ऐकला'. मनाली ला काही कळत नव्हते मग पलीकडूनती बाई  म्हणली, थांबा हं, देते फोन. आणि मग फोन एका पुरुषाने घेतला आणि हो तोच आवाज. सुनीलच होता. सुनीलने विचारले, मनाली, कशी आहेस? मनाली ने कापर्या आवाजात विचारले, कोण बोलतय? पलीकडून आवाज आला कि अग. आवाज पण विसरलीस? मी सुनील बोलतोय. तुझा आवाज ऐकून खूप बरे वाटले. दोन दिवसांनी हॉस्पिटल मधून बाहेर पडतोय. मला भेटायला येशील का?
मनाली ने अचानक फोन ठेवून दिला. तिला काही कळतच नव्हते. आता मात्र कोणाशीतरी बोलयला हवे होते. भेटायला कशाला बोलवत असेल आणि इतक्या वर्षांनी आता काय गरज भेटायची? तिने लगेच रोहित ला फोन लावला, त्याला सगळी परिस्थिती सांगितली त्यावर रोहित म्हणला कि तू कशाला फोन केलास मी त्या सुनील ला भेटून दम देणार होतो. मनालीला कळेना कि दम देण्यासारखे सुनील काहीच बोलला नव्हता किंवा काहीच त्याने केले नव्हते. तिने रोहित ला असे काहीही करू नकोस हे सांगितले आणि मी बघते काय करायचे ते असे म्हणून फोन ठेवला. तसाच पुन्हा फोन लावून दोन दिवसांनी भेटायची वेळ ठरवली. तिचे तिलाच समजत नव्हते कि नक्की आपण करतोय ते योग्य आहे कि नाही.
दोन दिवसांनी भेटीची वेळ आली. काहीशी चाचरत तिने हॉटेल मधे प्रवेश केला. एक वेत्र तिला बघून पुढे आला, हिने सांगितले कि ती सुनील नावाच्या व्यक्तीला भेटायला आली अहे. त्याने, this way please म्हणून तिला एका टेबलाशी नेले.

अजून कोणी आले नव्हते, तिने अनिकेतला मला यायला थोडा उशीर होईल असा मेसेज केला. १० मिनिटातच एक सुंदर स्त्री आणि सुनील, हो हो तो सुनीलच होता हॉटेल मध्ये आले. मनालीला समजेचना कि हि बाई कोण.
सुनील पुढे आला आणि म्हणला कि हेलो मनाली, कशी आहेस आणि हि माझी बायको सोफिया. सोफिया ने मनाली ला हाय म्हटले आणि दोघे तिच्या समोरच्या खुर्च्यांवर बसले. सोफिया ने आणलेली फुले मनालीला दिली. तिच्यापेक्षा कितीतरी पतीने सुंदर असलेली मोकळ्या स्वभावाची सोफिया बघून मनालीला क्षणभर असूया वाटली. आणि त्या दोघांमधला मोकळेपणा बघून मनालीच्या मनावरचे दडपण थोडे कमी झाले.
इतक्यात हॉटेल मध्ये रोहित आणि त्याचा एक मित्र तिला शिरताना दिसले आणि काही कळायच्या आताच रोहित त्यांच्यासमोर उभा होता.
सुनील ला बघून त्याचा चेहरा संतापाने लाल झाला होता आणि सुनील काही बोलायच्या आतच त्याने सुनील च्या एक थोबाडीत मारली.

या अनपेक्षित प्रसंगाने सगळेच अगदी सुन्न होऊन गेले. मनालीने डोळे घट्ट मिटत देवाचा धावा मनातच सुरू केला. रोहीतने पुन्हा सुनीलवर हात उचलण्याआधीच रोहीतचा मित्र पुढे झाला.त्याने रोहीतला आवरले. आपला लाल झालेला गाल चोळत सुनील म्हणाला, "वा ! क्या बात है ! आपके तमाचे की भी कमाल है. मानलं तुम्हाला मेव्हणेबुवा. जावयाचं काही चुकलं तर त्याचा कान उपटायचा अधिकार तर मेव्हण्याचा असतोच. आता तो वाढवून मला सरळ थोबाडीतच दिलीत. एकदम प्रमोशनच झालं की."

सुनीलच्या या अनपेक्षित पण विनोदी विधानाने वातावरणातील ताण एकदम कमी झाला. मनाली पायातील शक्ती गेल्यासारखी मट्कन खाली बसली. सोफियाने तिला सावरले. आपला राग आवरत आणि आपले हात चोळत रोहीतने खुर्ची पुढे ओढली. एका मागोमाग एक असे सर्वजण खुर्च्यांवर बसून एकमेकांकडे भांबावलेल्या नजरेने पाहू लागले. काय बोलावे कोणालाच कळेना. ती कोंडी फोडली ती सुनीलने. तो मनालीकडे पहात म्हणाला, " I am sorry, Manu ! हा तुला अतिशय मोठा धक्का असणार. मी जो दहा वर्षांपूर्वी गायब झालो तो आत्ताच पहिल्यांदा भेटतोय तुला. ते ही अशा विचित्र प्रसंगात. मला खरं तर तुझ्याशी खाजगीत बोलायचे होते. मी गेल्यावर तुझी काय अवस्था झाली असेल त्याचा मी विचारच करू शकत नाही. पण माझा नाईलाज होता. पण तू इथे मुंबईत कशी आलीस? इतक्या लवकर मला विसरलीस? "

मनालीने केवळ मान हलवली. तिचे डोळे पाण्याने डबडबले होते. सोफियाने मनालीला जवळ घेतले. तिच्या पाठीवरून हात फिरवत सोफिया म्हणाली, "खूप सोसलास ना गं? आपला नवरा असा अचानक गायब झाल्यावर करायचे तरी काय? मला तर बाई कल्पनाच करवत नाही. आणि आता तर हे सगळे प्रकरण विचित्रच होऊन बसलंय."

रोहित एकदम चिडून म्हणाला, " हो! You Have no idea! आत्ता कुठे माझी बहीण त्या दु:खी स्वप्नातून बाहेर पडून तिचा संसार परत सजवते आहे. सुखी आहे ती आता. आणि हा - हा इसम परत तिच्या सुखात विष कालवायला हजार झाला आहे. मी हे मुळीच सहन करणार नाही. मनालीने तिचा मार्ग शोधला आहे. तिला आता तुझ्यासारख्या माणसाची मुळीच जरुरी नाही.

सोफियाने आपले डोळे थोडेसे बारीक करत म्हटले, " शायद आपकी बात भी सही है. लेकिन ये भी सून लेना. मैने भी शबीरके साथ शादी की है. आणि हो, आता तो सुनील नाही. त्याने पण त्याचा भूतकाळ टाकून दिला आहे. तो आता माझा प्यारा शबीर आहे. त्याचा आजार ही आता बरा आहे. आम्ही सुखात आहोत. "

मनाली आणि रोहित आश्चर्याने ओरडले, " काय? शबीर ! म्हणजे तू मुसलमान झालास? धर्म बुडवलास आपला? सोफीया म्हणाली, " हो, त्या दिवशीच्या गोळीबारानंतरच्या दंगलीमध्ये शबीर जखमी झाला. त्याच्या डोक्याला जखम झाली. त्याच्या memory वर पण परिणाम झाला. माझ्या अब्बाजानच्या दवाखान्यात त्याला गुलमर्गला आणले गेले. मी त्याची सेवा करून त्याला परत माणसात आणले. माझ्यावरच्या प्रेमाने त्याने इस्लाम धर्म स्वीकारला. आता तो माझा प्यारा शबीर आहे. सुनील नाही !"

मनाली आणि रोहित दोघेजण जणू डोक्यात दगड पडल्यासारखे आश्चर्यचकित झाले होते. त्यातून बाहेर पडत रोहित म्हणाला, " मग तुम्ही इथे झक मारायला कशाला आलात? आपला धर्म बुडवून आणि दुसरे लग्न करून तू सुखी असशील तर माझ्या बहिणीच्या मार्गात काटे पेरायला तू कशाला आलास इथे? ती पण दुसरे लग्न करून सुखी आहे तिच्या संसारात. तिला तुझी जरुरीच नाही. "

सुनील / शबीरने तोंड उघडले. तो म्हणाला, " क्यों नहीं ? Actually, तिलाच माझी जास्त जरुरी आहे. लक्षात घ्या की मी इस्लाम स्वीकारलाय. आता शबीर आहे मी. मला एकापेक्षा जास्त लग्ने कायदेशीरपणे करता येतात आणि माझे मनालीशी झालेले लग्न आपोआप संपत नाही. ती माझी अजून ही काश्मीरच्या कायद्यानुसार बीबी आहे. और इसलिये उसकी दुसरी शादी कानून के खिलाफ है. उसका मतलब ये है की शादी और बच्चा दोनों ही illegal हैं. मैं अभीतक इनका शौहर हूँ."

हे असले राक्षसी स्पष्टीकरण ऐकून मनाली एकदम संतपलीच. ती ओरडली, " का माझ्या राशीला लागला आहेस रे सैताना ! आधी माझा शारिरिक छळ केलास. नंतर गायब होऊन मानसिक छळ. कसे दिवस काढले मी, माझे मलाच माहीत. आणि इतक्या वर्षांनंतर आता कोठे मला जरा सुख मिळू लागले तर हजर झालास परत मला छळायला. जीव घेऊन टाक माझा म्हणजे तरी समाधान होईल तुझे."

सोफिया पुढे होऊन म्हणाली, " आप गलत समझ रही है, मनालीजी. हमे आपको कोई तकलीफ नही देनी है. हम तो आपकी मदद करना चाहते है. आपको तो शबीर से तलाक लेना जरूरी है. तब ही आपकी दुसरी शादी legal हो सकती है. हमे भी आपके मदद की जरूरत है. हम दोनो एक दुसरे की मदद करके इस मुश्किल से निकाल पद सकते है."

रोहित हे ऐकून एकदम उचकून म्हणाला, " लाज वाटत नाही का असे बोलताना ? हा काय साट्यालोट्याचा प्रकार आहे का ? आणि आता तुमच्यासारख्या लोकांची आम्ही काय मदत करणार? माझं तर डोकंच चालायचं बंद झालंय ! "

शबीर पुढे झुकून म्हणाला, " हे पहा,  माझ्या मूळच्या आई-वडिलांचा व्यापाराचा मोठा झमेला आहे. ते दोघे खूप म्हातारे झाले झाले आहेत. त्यातच त्यांची याददाश्त पण पहिल्यासारखी राहिली नाही. त्यांना अजून मनालीच माझी बायको वाटते. मी अजूनही त्यांच्याकरिता सुनील आहे. त्यांना त्यांची इस्टेट आपल्या दोघांच्या नावावर करायची आहे. त्यासाठी आपण दोघे श्रीनगरला जोडपे म्हणून जायला आणि रहायला हवे. थोड्याच दिवसात ते आपली इस्टेट माझ्या नावावर करतील. मग इसके बाद मैं मनाली को तलाक दे दूँगा. आपका रास्ता साफ़ होगा और मेरा भी.  सिर्फ ये एक ही solution है हमारी हालत का ! आप भी खूश होंगी और हं भी, आखिरमें ! "

हे विचित्र बोलणे ऐकून मनाली तर बेशुद्धच पडली आणि रोहित वेड्यासारखा सोफीया-शबीरकडे पहात राहिला.

एव्हाना रेस्टॉरंटमधील सर्व लोकांच्या नजरा यांच्या टेबलावर खिळल्या होत्या. मनाली बेशुद्ध अवस्थेत टेबलावर मान टाकून पडली होती. इतक्यात सुनील उर्फ शबीरचा फोन खणखणला. रेस्टोरेंट मधे पससरलेल्या शांततेत फोनवरील उर्दू भाषिक व्यक्तीचे बोलणे शबीरच्या शेजारीच बसलेल्या सोफीयाला स्पष्ट ऐकू येत होते. कुठल्यातरी रिमोट कंट्रोलचे बटन दाबण्याचा आदेश त्याला वारंवार दिला जात होता. जराही वेळ न दवडता मोठ्या हुशारीने सोफीयाने टेबलावरील काचेचा ग्लास शबीरच्या डोक्यावर आपटले. अचानक बसलेल्या आघाताने शबीर खुर्चीवरून खाली कोसळला. बुरख्यातून काढलेले पिस्तुल मानेवर ठेवत सोफीयाने फोन संदर्भात शाबीरला खडसावून विचारले. आपला खेळ संपला आहे हे लक्षात येताच मनालीला दिलेल्या पुष्पगुच्छात बॉम्ब ठेवल्याची शबीरने कबुली दिली. रेस्टॉरंटसमोरच असलेल्या अमेरिकन कॉन्सुलेटच्या परिसरात घातपात घडवून आणण्याची जबाबदारी एका दहशतवादी संघटनेने शाबीरकडे सोपवली होती. आपल्याकडील C.B.I.चे ओळखपत्र दाखवित सोफीयाने रेस्टॉरंट मॅनेजरला पोलीस फोर्स आणि बॉम्ब निकामी करणाऱ्या पथकाला ताबडतोब बोलावण्याची सूचना केली.

पुढील पाचच मिनिटात रेस्टॉरंट रिकामे केले गेले. मनालीलाही जवळच असलेल्या रुग्णालयात घेऊन जाण्यात आले. रोहित तिच्याबरोबरच होता. मागोमाग सोफीया सुद्धा रुग्णालयात येऊन पोहचली. रोहितने काही विचारायच्याआधीच सोफीयाने सगळ्या गोष्टींचा उलगडा केला.

गेली काही वर्षं सोफीया गुप्तहेर खात्यात दहशतवादी संघटनांच्या शोधमोहिमेत काम करत होती याचा शबीरला थांगपत्ता नव्हता. सहा महिन्यांपूर्वी शबीरला आलेला एक फोन टॅप करण्यात तिला यश आले. शबीरला पुराव्यासहित पकडता यावे म्हणून तो मिशनवर असताना त्याच्याबरोबर राहता येईल असे काहीतरी करणे तिला भाग होते. म्हणूनच शबीरची वडिलोपार्जित प्रॉपर्टी आपल्या नावावर करण्याचा तगादा तिने शबीरकडे लावला. अमेरिकन कॉन्सुलेट समोरील रेस्टॉरंटमध्ये मनालीला बोलावून घेण्याचा बेत सोफीयाचाच. शबीरसाठीही ती जागा मोक्याची असल्यामुळे त्याने विरोध करण्याचा प्रश्नच नव्हता. सोफीयाचे बोलणे संपते ना संपते तोच डॉक्टरांनी मनाली शुद्धीवर आल्याचे सांगितले.

रोहित लगबगीने मनालीच्या रूमकडे गेला. पण सोफीया मात्र आल्या पावली मागे वळली. ‘ सोफीया आणि सुनील यांना समज देऊन परत पाठवले आणि आता पुन्हा काही ते तुला त्रास द्यायला येणार नाहीत ’ असा खोटा दिलासा रोहितने मनालीला दिला. ताबडतोब रोहितने अनिकेतला फोन लावला. रोहित काही बोलायच्या आधीच अनिकेतने चेष्टेने विचारले, “ झाली का समाजसेवा?” त्याच्या ह्या प्रश्नाचा संदर्भ रोहितला लागत नव्हता.

त्याचा उडालेला गोंधळ लक्षात घेऊन अनिकेत हसत सांगू लागला, “ अरे आज सकाळी माझा USA व्हिसा मिळाल्याचा ई-मेल आला आणि पासपोर्ट कलेक्ट करण्यासाठी कॉन्सुलेटला गेलो. अचानक काही गोंधळ झाल्यामुळे कॉन्सुलेट पूर्ण रिकामे करण्यात आले. तिथून बाहेर पडतानाच तुला एका स्ट्रेचरवरील बाईबरोबर अँब्युलन्समधून जाताना पाहिले”….